प्रो.७३८५७१८८८३
७४१०५७६५२६

रुद्राक्ष कलेक्शन
न.प.संस्कृती भवन समोर
मेन रोड,औसा

दैनिक
# लातूर टाइम्स

संपादक मो. ८८५६८०९९३८ व्यवस्थापक मो. ७७५७०१५४८५

RNIMAHMAR/2012/47779

▮ लातूर ▮ वर्षे ४४ ▮ अंक २५६ ▮ मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर २०२५ ▮ किंमत १ रु. ▮ पृष्ठे - ४▮ E-MAIL - Laturtimes24@gmail.com OMD - 3482014-2017

प्रो.७३८५७१८८८३
७३९७८२८८८३
कृष्णीका टुर्स अ‍ॅन्ड ट्रॅव्हल्स

न.प.संस्कृती भवन समोर
मेन रोड,औसा

## आदिवासी समाजाचा इतिहास व संस्कृतीच्या जतनासाठी संशोधनाची गरज-आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक वुईके

मुंबई : आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास आणि आदर्श संस्कृती जतन करून पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सखोल संशोधन आणि अध्ययनाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले.मुंबई विद्यापीठातील आदिवासी अध्ययन व संशोधन उत्कृष्टता केंद्राचे उद्घाटन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांच्या हस्ते झाले. यावेळी 'आदिवासी अस्मिता' आणि त्यांचे 'सांस्कृतिक महत्त्व' या विषयावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे माजी अध्यक्ष हर्ष चौहान, प्रा. शामराव कोरेटी, अतुल जोग उपस्थित होते.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, या संशोधन केंद्राच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वैविध्य यावर सखोल अभ्यास करण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना आदिवासी समाजाच्या इतिहास, संस्कृती आणि अस्मितेचा अभ्यास करण्यासाठी नव्या संधी उपलब्ध होतील. भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त सन २०२४-२५ हे वर्ष जनजाती गौरव वर्ष साजरे करण्यात येत आहे. भगवान बिरसा मुंडा यांचे आदिवासी समाजासाठी जल, जमीन आणि जंगलाच्या हक्कांसाठी दिलेले योगदान अभूतपूर्व आहे. त्यांच्या कार्याचा परिचय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यातील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना भगवान बिरसा मुंडा आणि इतर आदिवासी क्रांतिकारकांच्या कार्याचा परिचय करून देण्यासाठी माहितीपर पुस्तिका वितरित करण्यात येणार आहेत.



निसर्गपूजक आदिवासी समाजाने आपल्या श्रद्धा, संस्कृती आणि जीवनमूल्यांच्या माध्यमातून पर्यावरणाशी सुसंवाद साधत जीवन जगण्याची अद्वितीय परंपरा निर्माण केली आहे. या परंपरेचे संवर्धन आणि प्रसारासाठी शास्त्रशुद्ध संशोधनाची आवश्यकता असल्याचेही आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके यांनी यावेळी सांगितले.

यावेळी प्रा. रवींद्र कुलकर्णी, हर्ष चव्हाण, अतुल जोग यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रकाश मसराम यांनी केले तर आभार डॉ. विनोद कुमारे यांनी मानले.

## लातूरमध्ये लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त एकता पदयात्रेचे आयोजन

**लातूर** : लोहपुरुष म्हणून ओळखले जाणारे भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त लातूर शहरात युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय भारत सरकार अंतर्गत कार्यरत माय भारत, राष्ट्रीय सेवा योजना व जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथे पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही पदयात्रा १२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ७:३० वाजता लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथून निघणार आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आल्यानंतर पदयात्रेचा समारोप होईल.

शहरातील विविध भागातून नागरिक, विद्यार्थी, तसेच सामाजिक संस्था यात सहभागी होणार आहेत. या उपक्रमाद्वारे सरदार पटेल यांच्या कार्याची महती जनतेपर्यंत पोहोचवण्याचा आणि त्यांच्या 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या विचारांना चालना देण्याचा प्रयत्न असून भारताच्या ऐक्यासाठी कार्य केलेल्या लोहपुरुषाला आदरांजली वाहण्यासाठी प्रत्येक नागरिकाने या पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी शशांक रावूला, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

## क्रिकेटच्या वादातून गोळीबारात तरुणाचा मृत्यू

जळगाव : शहरातील कांचन नगरातील विलास चौकात क्रिकेटच्या वादातून झालेल्या गोळीबारात एका तरुणाचा मृत्यू झाला. आकाश उर्फ टपऱ्या युवराज बाविस्कर असं मृत तरुणाचं नाव असून तर या घटनेत अन्य तीन जण जखमी झाल्याची घटना रविवारी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास घडली. गोळीबार करणारा आकाश सपकाळे हा पसार झाला आहे.जळगाव शहरात रविवारी दुपारी क्रिकेटच्या वादातून तांबापुरा परिसरात झालेल्या दगडफेकीची घटनेचा तणाव निवळत नाही तोच रात्री कांचन नगरातील विलास चौकात जुन्या वादातून गोळीबार झाला. यामुळे किरकोळ वादातून जिल्ह्यात गुन्हेगारी वाढताना दिसत आहे.कांचननगर भागात दोन युवकांमध्ये किरकोळ कारणावरून वाद निर्माण झाला. हद्दपार आकाश सपकाळे उर्फ डोया आणि सागर सपकाळे यांच्यामध्ये जुना वाद आहे.रविवारी परिसरात संध्याकाळपासून धुसफूस सुरू होती. रात्री हा वाद वाढत जाऊन आकाश याने सागरच्या घरासमोर येऊन गोळीबार केला. यात सागर सपकाळे यांचे भाचे गणेश सोनवणे यांच्या हाताला तर तुषार रामचंद्र सोनवणे यांच्या कानाला व आकाश बाविस्कर यांच्या छातीत गोळी लागली. जखमींना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्या ठिकाणी आकाश बाविस्कर याचा उपचार सुरू असताना मृत्यू झाला.

## दिव्यांगांप्रती संवेदनशीलता व जाणीव जागृतीसाठी मंगळवारी जिल्हास्तरीय कार्यशाळा

**लातूर** : जिल्हा प्रशासन व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ कलम ३९ अन्वये दिव्यांगांप्रती संवेदनशीलता व जाणीव जागृतीसाठी मंगळवार, ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात ही कार्यशाळा होईल.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे राहणार असून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधिक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. जिल्हा न्यायालयाचे ज्येष्ठ विधीज्ञ ड. श्रीराम देशपांडे, केंद्रीय सल्लागार मंडळाचे सदस्य सुरेश पाटील, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यलयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, जिल्हा दिव्यांग पुनर्वसनचे कार्यवाहक डॉ. योगेश निटुरकर यांचीही उपस्थिती राहणार आहे.या कार्यशाळेत दिव्यांगांच्या विविध कायदेविषयक बाबीवर चर्चा व मार्गदर्शन होणार आहे. या कार्यशाळेला जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी केले आहे.

## विश्वधर्मी मानवता तीर्थभवनातून निघणारा संदेशच जगाला विनाशापासून वाचवेल - डॉ. विश्वनाथ कराड

**लातूर** : भारतीय संस्कृतीचे वसुधैव कुटुंबकम् व एकं सत् विप्रा बहुदा वदंती हा संदेशच जगाला विनाशापासन वाचवू शकतो. हाच संदेश रामेश्र्वर रूई येथे साकारलेल्या एकमेवाद्विितीय अशा 'विश्र्वधर्मी मानवतातीर्थ भवना' च्या माध्यमातून संपूर्ण जगाला देण्याचा छोटासा प्रयत्न आहे. विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातूनच जगात शांती नांदेल अशी श्रध्दा आणि पूर्ण निष्ठा आहे. असे विचार विश्र्वधर्मी प्रा. डॉ. विश्र्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केले.विश्र्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्र्वर रुई यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या 'विश्र्वधर्मी मानवता तीर्थ भवनात' लेखक लक्ष्मण सूर्यभान घुगे यांच्या लेखणीतून विश्र्वधर्मी प्रा. डॉ. विश्र्वनाथ दा. कराड यांच्या ज्ञान, विज्ञान आणि अध्यात्माची प्रयोगशाळा या संकल्पनेवर आधारीत 'विश्र्वशांतीची महागाथा' व संत श्री ज्ञानेश्र्वर माऊलींच्या संघर्षमय जीवनाचं सुंदर आख्यान महाकादंबरी 'सुवर्णपिंपळ' या ग्रंथांचे प्रकाशन विश्र्वधर्मी प्रा. डॉ. विश्र्वनाथ दा. कराड आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रगतशील शेतकरी काशीराम दा. कराड, डॉ. हनुमंतराव कराड, वरिष्ठ सल्लागार गिरीश दाते, संचालक डॉ. महेश थोरवे, डॉ. राऊत आणि योगेश पारखी उपस्थित होते.डॉ. विश्र्वनाथ दा. कराड म्हणाले, सध्या संपूर्ण जगात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सर्व सुख सुविधांसह झालेली पराकोटीची भौतिक प्रगती असूनसुद्धा दुसरीकडे हिंसा, रक्तपात, द्वेष, गोंधळ, अराजकता, जातीधर्मातील



तेढ, देशांच्या सीमा या सारख्या क्षुल्लक कारणांमुळे अत्यंत संशय, भिती व तणावाचे वातावरण निर्माण झालेले दिसून येते. आशा वेळेस रामेश्र्वर रुई येथे उभारण्यात आलेल्या विश्र्वधर्मी मानवतातीर्थ भवनातून संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देण्यात येत

## शहर भाजपच्या राष्ट्रीय एकता दौडला उत्स्फुर्त प्रतिसाद

**लातूर** : देशाचे माजी गृहमंत्री तथा लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त शहर जिल्हा भाजपाच्या वतीने राष्ट्रीय एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. विविध चार गटांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या दौडमध्ये पाच हजारापेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग घेऊन या दौडला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. देशाची एकात्मता अखंडीत ठेवण्यासाठी क्रिडाक्षेत्राचे मोठे योगदान असून खेळाच्या माध्यमातून एकात्मतेला अधिकची बळकटी मिळते असे सांगत भाजप शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी या एकता दौडला उत्स्फुर्त प्रतिसाद दिल्याबद्दल स्पर्धकांसह लातूरकरांचे आभार व्यक्त केले.

एक भारत श्रेष्ठ भारत ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी देशाचे तात्कालीन गृहमंत्री तथा लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशातील ५६२ संस्थांने खालसा करत त्यांना भारतात सहभागी करून घेतले होते. त्यांच्यामुळेच निजाम राजवटीतून मराठवाडा मुक्त झालेला होता. त्यामुळेच लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने आज सोमवार दि. १० नोव्हेंबर रोजी सकाळी ६.३० वा. राष्ट्रीय एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते.




## जिल्हा परिषद निवडणुकीसाठी नियुक्त नोडल अधिकारी यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

**लातूर** : राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी जिल्हास्तरावर नियुक्त सर्व नोडल अधिकाऱ्यांनी आपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या काळजीपूर्वक पार पाडाव्यात. यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय नोडल अधिकारी यांच्या बैठकीत त्या बोलत होत्या.

निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश पवार, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुक्मे, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी राजेंद्र नागणे यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने आणि शांततेत पार पाडण्यासाठी सर्व नोडल अधिकारी यांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी.

ग्रामीण भागातील मतदान केंद्रांची सद्यस्थितीचा आढावा घ्यावा, त्याठिकाणी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी अधिकारी, कर्मचारी यांना योग्य प्रशिक्षण द्यावे. मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम हाती घ्यावेत. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करावी.

विशेषतः सोशल मिडीयावर लक्ष ठेवण्यासाठी पोलीस विभागाने विशेष कक्ष कार्यान्वित करावा, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच कायदा व सुव्यवस्था, मनुष्यबळ व्यवस्थापन आदी विविध अनुषंगाने यावेळी आढावा घेण्यात आला.उपजिल्हाधिकारी श्री. पवार यांनी जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेले विविध कक्ष आणि त्याच्या नोडल अधिकारी यांनी पार पाडावयाची जबाबदारी याविषयी माहिती दिली.




## बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र व्हेंटिलेटरवर

मुंबई : बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र व्हेंटिलेटरवर आहेत. श्र्वास घेण्यास त्रास होत असल्यामुळे त्यांना कृत्रिम श्र्वसन यंत्रणेवर अर्थात व्हेंटिलेटरवर ठेवले आहे. मागील दहा दिवसांपासून धर्मेंद्र मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार घेत आहेत. पण त्यांच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा नाही. ही माहिती मिळाल्यामुळे चाहते धर्मेंद्र यांची तब्येत सुधारावी यासाठी प्रार्थना करू लागले आहेत.

धर्मेंद्र ८९ वर्षांचे आहेत. मागील काही महिन्यांपासून ते अधूनमधून वेगवेगळ्या कारणाने आजारी पडत होते. अमेरिकेत जाऊन उपचार घेतले तरी त्यांच्या प्रकृतीत विशेष सुधारणा झाली नाही. आता मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पण प्रकृतीत अपेक्षित सुधारणा नाही. प्रकृती खालवली आणि श्र्वास घेण्यास त्रास होऊ लागला म्हणून त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवले आहे. यामुळे धर्मेंद्र यांचे चाहते आणि नातलग चिंतेत आहेत.

## लातूर ग्रामीण मधील १५ अंगणवाडी इमारत बांधकामासाठी १ कोटी ६८ लाखाचा निधी




**लातूर** : ग्रामीण विधानसभा मतदार संघातील १५ नवीन अंगणवाडी इमारतीच्या बांधकामासाठी भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून १ कोटी ६८ लक्ष रुपयांचा निधी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत २९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये मंजूर झाला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने दुरावस्था झालेल्या अंगणवाड्याचे रूपडे बदलणार आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अनेक गावातील अंगणवाड्याची दुरावस्था झाल्याने त्या ठिकाणी नव्याने अंगणवाडी इमारतीचे बांधकाम करण्यात यावे याकरिता भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील १५ ठिकाणच्या अंगणवाडीचे नव्याने इमारत बांधकामासाठी १ कोटी ६८ लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. प्रत्येक अंगणवाडीला ११ लक्ष २५ हजार रुपये एवढा निधी प्राप्त होणार असून या निधीतून दुरावस्था झालेल्या अंगणवाडीचे स्वरूप बदलून अत्यंत देखणी इमारत उभी राहणार आहे.जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत मंजुरी मिळालेल्या १५ ठिकाणच्या नवीन अंगणवाडी इमारत बांधकामात लातूर तालुक्यातील ६, रेणापूर तालुक्यातील ३ आणि भादा सर्कल मधील ६ अंगणवाडीचा समावेश आहे. त्यात लातूर तालुका – शिऊर क्रमांक दोन, चिंचोली ब क्रमांक एक, खुलगापूर क्रमांक दोन, मुरुड क्रमांक चार, मुरुड क्रमांक दहा, रेणापूर तालुक्यातील – सेलू खुर्द, कामखेडा, सुकणी आणि भादा सर्कल मधील रिंगणी क्रमांक एक, वडजी क्रमांक एक, भादा क्रमांक तीन, शिवली क्रमांक तीन, वरवडा क्रमांक एक, समदर्गा येथील अंगणवाडीच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी मान्यता मिळाली आहे.भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी विविध गावातील अंगणवाडीच्या नवीन इमारती बांधकामासाठी १ कोटी ६८ लक्ष रुपयाचा निधी मिळवून दिल्याबद्दल त्या त्या गावातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह अंगणवाडीच्या मदतनीस, सेविका आणि पालकांनी आ.रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# हापूस आंबा लांबणीवर...!

संतोष वायंगणकर कोकणच्या किनारपट्टीला मागील काही दिवसांमध्ये मुसळधार पाऊस, वादळी पाऊस असे समिश्र वातावरण तयार झाले आहे. साहजिकच याचा एक विचित्र परिणाम आंबा बागायतींवर होत आहे. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात सर्वसाधारणपणे मोहोर येतो. यावर्षी मोहोर आलाच नाही. थंडीही गायब आहे. आता जरी पाऊस थांबला तरीही भरपूर मोहोर येण्यास डिसेंबर महिना उजाडणार आहे. यामुळे साहजिकच यावर्षीचा प्रथमचा आंबा बाजारात यायला मार्च महिना उजाडणार आहे. त्यामुळे कोकणातील हा हापूस आंबा देशभरातील बाजारात मोठ्या प्रमाणावर दिसायला निश्र्चितच एप्रिल-मे महिना उजाडण्याची शक्यता नाकारता येणार नाही... महाराष्ट्रात पाऊस थांबायचं नाव घेत नाही. कोकणातील भातशेतीवर या अतिवृष्टीचा परिणाम गावो-गावी झाला. यामुळे कोकणातील भातशेती पाण्याखाली गेली. गुरांना लागणारे गवतही मिळणे अवघड झाले आहे. पाणथळ भागात असणारी शेती पाण्याखालीच गेली आहे. यामुळे कोकणातील भातशेती करणारा शेतकरी, तसेच नाचणी आणि तृणधान्य करणाऱ्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. एकीकडे भातशेतीचे नुकसान झालेले असताना आंबा, काजू बागायतदारही चिंतेत आहेत. याचे कारण नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यातही पाऊस कोसळत आहे. आजही केव्हा आकाश भरून येईल आणि पाऊस कोसळेल ही टांगती तलवार शेतकऱ्याच्या डोक्यावर कायम आहे. साहजिकच याचा परिणाम आंबा बागायतीवर होत आहे. आंबा बागायतीमध्ये पावसामुळे चिखल आहे. पाऊस कोसळत असल्याने नोव्हेंबरमध्ये येणारी थंडी अद्यापही सुरू झालेली नाही. जो काही भागामध्ये आंबा बागायतीत आंब्यांना मोहोर येतोय असे वाटत होते त्या भागातील आंबा बागायतीत आलेला थोडाफार मोहोरही पावसाने कुजला आहे. सतत जो पाऊस पडत आहे त्यामुळे आंबा, काजू, या फळबागायतींना पोषक वातावरण होणं आवश्यक असते असे वातावरणही तयार झालेले नाही. त्यामुळे त्याचा फटका आंबा बागायतदारांना बसणारा आंबा बागायतदार पाऊस कधी जातोय आणि नोव्हेंबर डिसेंबरची कडाक्याची थंडी कधीपासून पडतेय त्या वातावरणाच्या प्रतीक्षेत आहेत. दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात थंडीला सुरुवात होते. अनेक आंबा बागायतीत कणीदार मोहोर आलेला असतो. कोकणातील आंबा काजू बागायतदार शेतकरी आपल्या बागेतील झाडांचा मोहोर पाहून सुखावलेला असायचा. अगदी मार्च, एप्रिल, मे महिन्यात आंबा, काजू बागायतीतून चांगल उत्पन्न मिळेल अशा आशेवर तो असायचा. वर्षभराच्या खर्चाचे आडाखे तो मनात मांडायचा; परंतु यावर्षी मात्र कोकणातील थंडी आणि मोहोरावर अंदाज बांधणाऱ्या या शेतकऱ्याला काय होईल काहीच सांगता येणारे नाहीय. तो चिंतेत आहे. निसर्गाच्या लहरीपणाने नैसर्गिक बदलाने कोकणातील शेतकऱ्यांचे आर्थिकतेचे चक्रही कोलमडले आहे. कलिंगडाची बागायत शेती करणारा शेतकरीही काय करायचे या चिंतेत आहे. सगळाच हंगाम लांबणार आहे. सुपारी बागायतदार देखील निसर्गचक्रात बेजार झाला आहे. कोकणात जसा आंबा, काजू मोठ्या प्रमाणात होतो तसेच सुपारी, नारळ बागायती क्षेत्रही मोठे आहे. रतांबा बागायती करणारे शेतकरी आहेत. गतवर्षी रतांब्याला चांगला दर आला होता. रतांबा बागायतदार आपल्याकडे कमी आहेत. पूर्वपार वडिलोपार्जित रत आपल्या देशभरात जरी वेगवेगळया जातीचा आंबा तयार होत असला तरीही कोकणच्या हापूसला अगदी जागतिक स्तरावरही तोड नाही. कोकणातील हापूस आंबा स्वादिष्टपणाला सर्वत्र प्रसिद्ध आहे. कोकण म्हटले की देवगड, रत्नागिरी हापूस हे आपसूकच नाव जोडले जाते. कोकणातील हा आंबा वेळेत पावसाने विश्रांती घेतली, भरपूर थंडी पडली, मोहोर वेळेवर आला तर साधारण फेब्रुवारीपासून बाजारात येतो आणि जूनच्या पहिल्या, दुसऱ्या आठवड्यापर्यत हा आंब्याचा हंगाम सुरू राहतो. कधी-कधी सुरुवातीला आंब्याचा असणारा दर नंतर मिळत नाही. काहीवेळा आंबा अचानकपणे बाजारात मोठ्या प्रमाणावर येऊ लागला की, आंब्याचा दर कमी होतो. आंबा बागायतदार शेतकऱ्याच्या हे सर्व अंगवळणी पडलेले आहे. काय घडू शकते याचा अंदाज बागायतदार शेतकऱ्याला येत असतो. यावर्षी अजुनही अधून-मधून कोकणात पाऊस पडत असल्याने आंबा हंगाम महिना-दीड महिना तरी लांबण्याची शक्यता आजच्या घडीला तरी निर्माण झाली आहे. कोकणच्या किनारपट्टीला गेले काही दिवसांमध्ये मुसळधार पाऊस, वादळी पाऊस असे समिश्र वातावरण तयार झाले आहे. साहजिकच याचा एक विचित्र परिणाम या आंबा बागायतींवर होत आहे. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात सर्वसाधारणपणे मोहोर येतो.

# या सवयी असतील तर शरीराचा होईल खुळखुळा, आताच बदला आणि शरीर बनवा लोखंडासारखे टणक





आपले शरीर आपल्या सवयींचा आरसा आहे. म्हणूनच चुकीच्या सवयींमुळे वेगवेगळे रोग होतात आणि निरोगी सवयी आरोग्याला कारणीभूत ठरतात. जाणूनबुजून किंवा नकळत आपण अशा सवयी हळूहळू आत्मसात करतो. ज्यामुळे मन आणि शरीर कमकुवत होऊ लागते.

या लेखात अशाच काही चुकीच्या सवयी सांगण्यात आल्या आहेत. जे शरीर आणि मनाला हळू हळू खातात आणि तुम्हाला आजारी बनवतात. यासोबतच आरोग्यदायी सवयी देखील सांगण्यात आल्या आहेत, ज्या तुम्हाला पूर्णपणे बदलतील आणि तुम्हाला निरोगी आणि तंदुरुस्त बनवतील.

फास्ट फूडच्या जागी घरचं जेवा-आजकाल कुठेही बसून बाहेरचे अन्न किंवा जंक फूड तुमच्यापर्यंत पोहोचवले जाते. पण सवय झाली तर लठ्ठपणा, कोलेस्ट्रॉल, मधुमेह, हृदयविकाराचे बळी होऊ शकतात. घरचे सकस खाऊन तुमची ही सवय बदला.

टीव्हीऐवजी शारीरिक हालचाल करा-तुम्हीही टीव्हीचे शौकीन असाल तर आता ही सवय बदला. कारण, सोफ्यावर किंवा पलंगावर झोपल्याने शरीराचे स्नायूही आळशी होतात. त्याऐवजी चालणे, फिरणे असे काही व्यायाम करा. याने तुमचे मनही प्रवाहित होईल आणि तुम्ही निरोगीही व्हाल.

अतिविचार करण्याऐवजी कृती करणे-अनेकदा आपले अपयश हे दुःखाचे कारण असते.

ज्यासाठी आपण फक्त विचार करत राहतो.

पण जोपर्यंत तुम्ही त्यासाठी कठोर परिश्रम करत राहू शकता कारण दुसरा कोणताच पर्याय नाही. त्यामुळे जास्त विचार करणे थांबवा, जागे व्हा आणि कृती करा.


## घामोळ्याच्या समस्येमुळे आहात त्रस्त? त्वचेची होणारी जळजळ कमी करण्यासाठी करा हे ५ सोपे उपाय




प्रत्येक स्त्रीला त्वचा सुंदर ठेवण्याची इच्छा असते. आपल्या त्वचेवर कोणताही डाग नसावा असे प्रत्येकाला वाटते. त्वचेच्या समस्या दूर करण्यासाठी बाजारात अनेक प्रकारची उत्पादने उपलब्ध आहेत. परंतु चेहऱ्यावरील नको असलेले केस काढून टाकण्यासाठी, फेस वॅक्सिंग हा एकमेव मार्ग आहे.

वॅक्सिंग केस पूर्णपणे काढून टाकते. पण वॅक्सिंग करताना होणाऱ्या असहाय्य वेदना नकोश्या वाटतात. जर चेहऱ्यावरील नको असलेले केस काढून टाकायचे असतील तर तुम्ही स्वयंपाक घरातील काही गोष्टींचा वापर करू शकता. या उपायासाठी तुम्ही बहुगुणी हळदीचा वापर करू शकता. यासाठी तुम्हाला बेसन, हळद आणि पील ऑफ मास्क या साहित्यांचा वापर करून आपण फेस वॅक्सिंग पॅक तयार करू शकता.असा करा वापर -फेस वॅक्सिंग पॅक बनवण्यासाठी लागणारं साहित्य-बेसन.हळद. पील ऑफ मास्क.असा करा वापर-हा फेस पॅक तयार करण्यासाठी ह्या गोष्टी एकत्र करा. त्यानंतर समप्रमाणात हे मिश्रण चेहऱ्यावर लावा. पॅक सुकल्यानंतर हळू हळू मास्क काढा.यामुळे चेहऱ्यावरील नको असलेले केस निघून जातील.

फेस वॅक्सिंग पॅकनंतर हे करा-फेस वॅक्सिंग पॅक झाल्यानंतर हातावर कोरफड जेल आणि गुलाबजल घेऊन चेहऱ्यावर लावा. चेहऱ्यावर चांगल्या पद्धतीने मसाज करा. यामुळे चेहऱ्यावर ग्लो येईल. हा उपाय तुम्ही आठवड्यात दोन वेळा करू शकता.







## डिलिव्हरीआधीचे ४८ तास का असतात महत्त्वाचे व शरीरात काय होतात बदल?

गरोदर स्त्रीची डिलिव्हरी होणे ही केवळ त्या स्त्रीसाठीच नाही तर तिच्या कुटुंबासाठी सुद्धा महत्वाची गोष्ट असते. सर्वांच्या मनात धाकधूक सुरु असते. चिंता असते पण उत्सुकता देखील असते. सतत देवाचा धावा केला जातो आणि डिलिव्हरी सुखरूप व्हावी म्हणून त्याला साकडं घातलं जातं. त्या स्त्रीशी निगडीत प्रत्येक व्यक्तीसाठी डिलिव्हरीच्या आधीचे ४८ तास अत्यंत महत्त्वाचे असतात. पण तुम्हाला माहित आहे का या ४८ तासांत काय होते?डिलिव्हरी आधी अशा काय गोष्टी घडतात? सामान्यत: या गोष्टी फार कमी लोकांना ठावूक असतात. जर तुम्हाला माहित नसतील तर काळजी करू नका कारण या लेखातून तुम्ही त्या सर्व गोष्टींबद्दल जाणून घेऊ शकता. चला तर जाणून घेऊया डिलिव्हरीच्या ४८ तास आधी नेमके होते काय!हृदयाची धडधड वाढते-जस जशी डिलिव्हरीची वेळ जवळ येते आणि हॉस्पिटल मध्ये जाण्याची लगबग सुरु होते तेव्हा स्त्रीच्या हृदयाची धडधड वाढू लागते. तिच्या मनात अनेक नानाविध प्रश्नांचा मारा सुरु होते. तिचे मन शंकेने व चिंतेने घेरले जाते. याचाच परिणाम म्हणून हृदयाचे ठोके वाढतात. आईच्या शरीरातील या बदलामुळे बाळाच्या हृदयाचे ठोके सुद्धा वाढतात. अशा स्थितीत स्त्रीला शांत ठेवणे आणि तिला सतत धीर देणे हे कुटुंबीयांचे काम आहे. वेळेत तिला हॉस्पिटल मध्ये पोचवणे महत्त्वाचे ठरते कारण तिथे कोणतीही समस्या आल्यास वैद्यकीय मदत तयार असते.

हात पाय सैल पडणे-डिलिव्हरी बद्दल विचार करताच कोणत्याही स्त्रीला भीती वाटते. कारण ती प्रक्रियाच तेवढी वेदनादायी असते. सतत त्याची चिंता सतावत असल्या कारणाने हात आणि पाय सैल पडतात. असे होण्याला सुद्धा शरीरातील एक हार्मोन कारणीभूत असते. रिलॅक्सीन नावाचे एक हार्मोन रिलीज झाल्या कारणामुळे असे होऊ लागते. हे हार्मोन पेल्विक आणि वजाईनाला लवचिक बनवते आणि त्यामुळे डिलिव्हरी सहज होण्यास मदत मिळते. अशावेळी सुद्धा खास करू पतीने आपल्या पत्नीला धीर देणे फायदेशीर ठरते.उत्साही सुद्धा वाटते-डिलिव्हरी जवळ आल्यावर जशी भीती वाटते तशीच ती डिलिव्हरी पूर्ण झाल्यावर आपले बाळ आपल्याला दिसणार हा विचार करून उत्साह सुद्धा वाटतो. केवळ हाच एक विचार स्त्रीला डिलिव्हरीच्या वेदना सहन करण्यास हिम्मत देत असतो. कुटुंबीय सुद्धा याला अपवाद नसतात. त्यांना सुद्धा एकीकडे भीती वाटत असते, पण दुसरीकडे लवकरच एका नव्या पाहुण्याचे घरात आगमन होणार आणि पूर्ण घरात आनंद संचारणार हा विचार करून ते उत्साही होत असतात आणि नव्या जीवाची आतुरतेने वाट पाहत असतात.बाळाशी संवाद साधा-तुम्हाला अभिमन्यूची गोष्ट तर माहीत असेलच, त्याने गर्भात असतानाच चक्रव्यूह भेदण्याचे रहस्य जाणले होते. ही गोष्ट अगदी खरी आहे की बाळ आपण बोलत असलेल्या गोष्टी ऐकते.

ते आपल्या आईचा आवाज खास करून ओळखते. म्हणून आईने सतत बाळाशी बोलत राहिलं पाहिजे. जेव्हा जेव्हा ताण जाणवेल तेव्हा तेव्हा छान छान गोष्टी करून बाळाशी संवाद साधत राहा. यामुळे तुम्ही तणावमुक्त व्हाल. केवळ आईनेच नाही तर घरातील इतर कुटुंबीयांनी देखील आवर्जून बाळाशी संवाद साधला पाहिजे.डिस्चार्जचा रंग बदलणे-डिलिव्हरी आधी घडणाऱ्या महत्त्वपूर्ण बदलांपैकी एक असा हा बदल आहे.

डिलिव्हरी आधी स्त्रीला आपल्या डिस्चार्जचा रंग बदलल्याचे दिसून येते. हा डिस्चार्ज हलक्या गुलाबी रंगाचा असतो. अनेकदा या डिस्चार्जसह स्पोटिंग सुद्धा सुरु होते. डिलिव्हरीच्या आधी गर्भाशयाचे तोंड उघडणे गरजेचे आहे. याचा संकेत असतो अगदी पातळ म्युकस निघण्यास सुरुवात होणे होय. जर अशी लक्षणे तुम्हाला दिसत असतील तर समजून जा की डिलिव्हरीची वेळ आली आहे. असेही होऊ शकते की तुम्हाला कोणत्याही वेदना वा डिस्चार्ज जाणवणार नाही. तुमच्या हृदयाची धडधड वाढणार नाही. जर तुम्हाला काहीच वेगळे वाटत नसेल तर स्वत:ला भाग्यवानच समजा. पण म्युकस निघण्यास सुरुवात होणे अत्यंत गरजेचे आहे. जेव्हा तुम्हाला म्युकस दिसेल तेव्हा समजून जा की डिलिव्हरीची वेळ जवळ आली आहे. अशावेळी त्वरित कुटुंबियांना सांगा आणि डॉक्टरांना कळवा.

# जेवताना मुलं चिडचिड करत असतील तर करू नका दुर्लक्ष,असू शकतो 'हा' गंभीर आजार!

किशोरावस्थेत बर्याचदा मुलांना त्यांच्या बॉडी इमेज आणि दिसण्याविषयी काळजी वाटत असते. ज्यामुळे ते हेल्दी खाण्यापासून स्वत:ला दूर ठेवू लागतात. अशाच अनेक गोष्टी पुढे मुलांमधील गंभीर आजारांना कारणीभूत ठरतात.इटिंग डिसऑर्डर (eating disorder) म्हणजेच आहारा सबंधित विकार ही एक मानसिक आरोग्य समस्या आहे. तसं तर प्रत्येक व्यक्ती या विकाराला बळी पडतो. हा विकार किशोरवयीन मुलांमध्ये सुद्धा विकसित होऊ शकतो. पण अशा वयात जर हा विकार झाला तर ती एक गंभीर बाब ठरू शकते कारण हा काळ शारीरिक विकासाचा असतो आणि या काळात आहारावर शक्य तितके लक्ष देणे आणि पौष्टिक घटक शरीराला पुरवणे महत्त्वाचे असते. या वयात हा विकार केवळ शारीरिक नाही तर मानसिक स्थितीवर सुद्धा परिणाम करू शकतो.जर वेळीच इटिंग डिसऑर्डरची लक्षणे ओळखून उपचार सुरु केले तर त्यामुळे होणाऱ्या दीर्घकालीन समस्या रोखता येतात आणि जीवनमान देखील उंचावते. या लेखाच्या माध्यमातून आपण किशोरवयीन मुलांमधील इटिंग डिसऑर्डरची कारणे, त्यावरील उपचार आणि बचाव करण्याच्या काही टिप्स जाणून घेऊ.इटिंग डिसऑर्डरची लक्षणे-सर्वात प्रथम आपण इटिंग डिसऑर्डरची काही लक्षणे जाणून घेऊया. कमी खाणे किंवा एकाच वेळी जास्त खाणे, लपून खाणे वा अन्नच लपवणे, लुक्स आणि वजन याबद्दल सतत चिंता व्यक्त करणे, त्वचा रुक्ष होणे आणि केस गळायला सुरुवात होणे, इनफर्टिलिटी तसेच मासिक पाळी उशिरा येणे, दातांना नुकसान पोहोचणे, जास्त व्यायाम न करणे आणि सतत वजन तपासणे, अन्न खाताना किंवा त्याबद्दल बोलताना तणावात राहणे, नैराश्य आणि चिंता सतावणे ही सर्व इटिंग डिसऑर्डरची लक्षणे आहेत.इटिंग डिसऑर्डरची कारणे-अधिकाधिक प्रकरणांमध्ये इटिंग डिसऑर्डरची योग्य कारणे माहितच पडत नाहीत. किशोरवयीन मुलांमध्ये मानसिक कारणांमुळे जसे की सुंदर दिसणे आणि आपल्या बॉडी इमेजबद्दल खुश नसणे यांसारख्या कारणांचा समावेश होतो. चिंता आणि नैराश्य ही सुद्धा दोन महत्त्वाची कारणे आहेत. बारीक दिसणे वा कोणाला आपल्याकडे आकर्षिक करण्याच्या विचाराने, बॉडी शेमिंग तसेच शाळेत दुसऱ्या मुलांनी टिंगल उडवल्यावर सुधा किशोरवयीन मुलांमध्ये इटिंग डिसऑर्डर दिसून येऊ शकतो.पालक सुद्धा जबाबदार ठरू शकतात-हो मंडळी, इटिंग डिसऑर्डर साठी खुद्द पालक सुद्धा जबाबदार ठरू शकतात. मुले त्यांच्या नजरेस पडणाऱ्या प्रत्येक खाण्या पिण्याच्या गोष्टीवर नजर ठेवतात आणि त्यातूनच ते अनेक गोष्टी शिकतात. याशिवाय आपले पालक एखाद्या पदार्थाबाबत काय विचार करतात, त्याबद्दल काय बोलतात याकडे सुद्धा लहान मुलांचे बारकाईने लक्ष असते आणि त्यातूनही अनेक समज ते स्वत:च करून घेतात. पालकांच्या या वर्तनाचा असा परिणाम होतो की एकतर मुलांना चांगल्या खाण्यापिण्याच्या सवयी लागतात किंवा एखादी इटिंग डिसऑर्डर ट्रिगर होते. मी जाडी होईन, टू नेहमी खात असतो अशी वाक्ये किंवा पालकांनी दुसऱ्याच्या जाडेपणाची उडवलेली खिल्ली इटिंग डिसऑर्डरला आमंत्रण देऊ शकते.मुलांचा इटिंग डिसऑर्डर पासून कसा बचाव करावा?पालक आणि मुले यांच्यातील योग्य संवादाने सुद्धा हा विकार रोखला जाऊ शक्ती, आपल्या मुलांना इटिंग डिसऑर्डर मुळे निर्माण होणाऱ्या समस्यांबद्दल समजून सांगा. त्यांना सांगा की याचा थेट परिणाम त्यांच्या शारीरिक विकासावर आणि मानसिक आरोग्यावर होऊ शकतो. मुलांना त्यांच्या मनातील विचार आणि भावना शेअर करण्यास प्रवृत्त करा. बॉडी इमेज आणि आपल्या त्वचेच्या रंगाबद्दल त्यांच्या मनात निर्माण होणारे नकारात्मक विचार दूर करण्याचा प्रयत्न करा. जर कोणी व्यक्ती त्यांची टिंगल उडवत असेल तर त्याला कसे सामोरे जावे हे त्यांना शिकवा. त्यांना आहाराचे महत्त्व सांगा. या छोट्या छोट्या गोष्टी सुद्धा तुमच्या मुलाला इटिंग डिसऑर्डर होण्यापासून वाचवू शकतात.यावर उपाय काय आहे?जे क्लिन सायकॉल यांच्या माध्यमातून केलेल्या एका सर्वेक्षणानुसार इटिंग डिसऑर्डरने ग्रस्त असणाऱ्या १२० मुलांपैकी एक तृतीयांश मुलांमध्ये ८ महिन्यांच्या ट्रिटमेंट नंतर सुधारणा दिसून आली आहे. यात काही मुलांना सायकोथेरेपी तर दोन तृतीयांश मुलांना सायकोएक्टीव्ह औषधे दिली होती. यातून कळले की इटिंग डिसऑर्डरचा जास्तीत जास्त संबंध हा मानसिक स्वास्थाशी निगडीत आहे. सायकोथेरपी जसे की कॉग्निटिव बिहेवरियल थेरेपी किंवा फॅमिली थेरेपी लहान मुलांना या विकारावर मात करण्यास मदत करते. यातून मुळे अगदी मोकळेपणाने आपल्या कुटुंबाशी मनातील गोष्टी बोलू लागतात. मानसिक समस्या जसे की चिंता आणि नैराश्य हे नेहमीच



इटिंग डिसऑर्डरचे कारण ठरतात. अशा स्थितीत मुलांना एंटीडिप्रेसेंट आणि एंटीसाइकोटिक औषधे दिली जातात.

# 'वंदे मातरम्' गीत देशाच्या सांस्कृतिक ऐक्याची भावना - विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर

मुंबई : वंदे मातरम् हे एक गीत नसून भारतवासीयांसाठी एक मंत्र आहे, ज्यातून प्रत्येक भारतीय एकमेकांशी जोडला गेलेला आहे. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखित 'वंदे मातरम' हे गीत भारताच्या ऐतिहासिक सुवर्णकाळाची, स्वतंत्र्यासाठी लढलेल्या माणसांच्या बलिदानाची आणि देशाच्या सांस्कृतिक ऐक्याची भावना व्यक्त करते, या शब्दात विधानसभा अध्यक्ष ड राहुल नार्वेकर यांनी विचार व्यक्त केले.

मुंबई विधानभवनच्या सेंट्रल हॉलमध्ये 'वंदे मातरम' गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास विधान परिषद सदस्य अमोल मिटकरी, विधिमंडळाच्या सचिव मेघना तळेकर, सचिव डॉ.विलास आठवले, सचिव शिवदर्शन साठे, विधानपरिषद सभापतींचे सचिव पंडीत खेडकर, विधानसभा अध्यक्षांचे सचिव सुनील वाणी तसेच विधिमंडळाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अध्यक्ष ड नार्वेकर म्हणाले की, वंदे मातरम् या गीताचा १५० वर्षांचा इतिहास पाहताना, आपल्याला त्याच्या शौर्य, देशभक्ती आणि समर्पणाचा विचार करावा लागतो. रवींद्रनाथ टागोर यांनी हे गीत पहिल्यांदा सादर केले आणि त्यानंतर ते प्रत्येक कार्यक्रमात आणि समारंभात राष्ट्रीय गीत म्हणून गायले जाते. हे गीत आज केवळ देशाच्या कानाकोपऱ्यात नाही, तर संपूर्ण जगात ऐकायला मिळते.अध्यक्ष ड.नार्वेकर यांनी सांगितले की, जी व्यक्ती भारताची अस्मिता, संस्कृती आणि इतिहास प्रेमाने स्वीकारतो, तो प्रत्येक वेळेला 'वंदे मातरम' गीत गात राहतो. हे गीत आपल्याला देशाच्या एकतेची आणि सामर्थ्याची जाणीव करून देते. येणाऱ्या काळात आपण सर्वजण या गीताचे अभिमानाने गायन करत राहू, आणि आपल्या राष्ट्राच्या महान परंपरेला पुढे नेण्याचे कार्य करू, असे ते म्हणाले.

# 'भाषिणी' तंत्रज्ञानावर आधारित व्हॉईस नोटद्वारे तक्रार नोंदवण्याची सोय- सचिव तुकाराम मुंढे

मुंबई : दिव्यांग कल्याण विभागात दिव्यांग व्यक्तींसाठी एआय-आधारित व्हाट्सप चॅटबॉट ७८२१९२२७७५ क्रमांक कार्यान्वित आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी असणाऱ्या योजनांसह तक्रार निवारण व्यवस्था 'एका क्लिकवर' उपलब्ध करून देणे, हा या सेवेचा मुख्य उद्देश आहे. दिव्यांग व्यक्तींना योजनांची माहिती मिळवताना किंवा तक्रारी दाखल करताना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी ही सेवा सुरू करण्यात आली आहे. या चॅटबॉटमध्ये भाषिणी तंत्रज्ञानावर आधारित व्हॉईस नोटद्वारे तक्रार नोंदवण्याची व्यवस्था आहे, असे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

सचिव मुंढे म्हणाले, या चॅटबॉटच्या माध्यमातून राज्य आणि केंद्र शासनाच्या योजनांची माहिती आता दिव्यांग व्यक्तींना जलद गतीने मिळू शकते. यामुळे तक्रार नोंदवून तिची सद्यस्थिती जाणून घेणे आता सोयीचे झाले आहे. 'सेल्फ-ट्रॅकिंग' सुविधेमुळे तक्रारीची सद्यस्थिती थेट व्हाट्सपवर तपासता येईल. 'भाषिणी' तंत्रज्ञानाच्या साहाय्याने, टाईप करणे शक्य नसलेल्या व्यक्ती आपली तक्रार मराठी किंवा इंग्रजी भाषेत फक्त आवाज रेकॉर्ड करून पाठवू शकतात.

शासनाच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत हा चॅटबॉट तयार करण्यात आला असून हा चॅटबॉट इतर चॅटबॉटपेक्षा वेगळा आहे. यात प्रगत एआय मॉडेलचा वापर केला आहे, जे वापरकर्त्याची भाषा, संदर्भ आणि तक्रारीच्या विषयाची गंभीरता ओळखून तक्रारीचे आपोआप वर्गीकरण करते व संबंधित अधिकाऱ्याकडे पाठवते. संबंधित अधिकाऱ्यांना २४ तासात तक्रारीची दखल घेणे बंधनकारक आहे.पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी अधिकाऱ्यांना तक्रार निवारणासाठी विशेष डॅशबोर्ड देण्यात आला आहे. तसेच विभाग साप्ताहिक स्तरावर सर्व तक्रारींचा आढावा घेणार असल्याचे सचिव मुंढे यांनी सांगितले.

# 'आपले सरकार सेवा केंद्र' नागरिकांच्या विश्र्वासाचे प्रतिक व्हावे - मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड.आशिष शेलार

मुंबई : शासनाने सुरू केलेली 'आपले सरकार सेवा केंद्र' ही योजना नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सेवांचा सुलभ लाभ मिळवून देण्यासाठी आहे. त्यामुळे मुंबई उपनगरातील प्रत्येक सेवा केंद्र हे नागरिकांच्या विश्र्वासाचे प्रतीक व्हावे, अशी अपेक्षा माहिती तंत्रज्ञान मंत्री तथा मुंबई उपनगर पालकमंत्री ड. आशिष शेलार यांनी व्यक्त केली आपले सरकार सेवा केंद्र वितरण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार, उपजिल्हाधिकारी सुभाष काकडे तसेच मुंबई उपनगरातील आपले सरकार सेवा केंद्र चालक उपस्थित होते.

पालक मंत्री ड.शेलार म्हणाले की, आज जगभर माहिती तंत्रज्ञानाच्या नव्या युगात सायबर धोकेही वाढले आहेत. महाराष्ट्राचा सायबर सुरक्षा सेल सक्षम आहे, तरीही प्रत्येक सेवा केंद्राने जबाबदारीने काम करून नागरिकांची माहिती सुरक्षित ठेवावी.

तंत्रज्ञानाचा वापर काळजीपूर्वक करावा. २०१८ च्या शासन निर्णयानुसार २५ हजार लोकसंख्येच्या मागे एक सेवा केंद्र होते, आता ती संख्या वाढवून दोन केंद्रे करण्यात आली आहेत.

या माध्यमातून नागरिकांना दाखले, प्रमाणपत्रे, नॉन-क्रीमीलेअर, अधिवास, उत्पन्न दाखला अशा एक हजारहून अधिक सेवांचा लाभ मिळतो.

शासन कार्यालयात वारंवार फेऱ्या न मारता, नागरिकांना त्यांच्या परिसरातच सेवा मिळावी,

हा या योजनेचा हेतू असल्याचेही पालकमंत्री ड शेलार यांनी सांगितलेमहाराष्ट्र शासन लवकरच सेवा केंद्रांच्या ब्रँडिंगसाठी व्यावसायिक संस्थेशी करार करणार असून, केंद्रांच्या कामकाजात एकसंध आणि व्यावसायिकता आणली जाणार असल्याचे मंत्री ड.आशिष शेलार यांनी सांगितले. यावेळी मुंबई उपनगर जिल्ह्यातील २३८ सेवा केंद्रांना या कार्यक्रमात प्रमाणपत्रे देण्यात आली. यात ७ दिव्यांग व्यक्तींना तर एका तृतियपंथीयाचासुद्धा सहभाग आहे.

मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार म्हणाले की, आपले सरकार सेवा वितरण अधिक कार्यक्षम



करण्यासाठी तांत्रिक सुधारणा राबविण्यात येत आहे.

व्हॉट्सपद्वारे प्रमाणपत्र पाठविणे, अर्ज प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता वापरणे आणि सर्व 'आपले सरकार' तसेच आधार केंद्रांचे जिओ-टॅगिंग पूर्ण करण्यात आले आहे.

यामुळे नागरिकांना त्यांच्या जवळच्या सेवा केंद्राचे ठिकाण गुगल मॅप व व्हॉट्सप चॅटबॉटद्वारे सहजपणे कळू शकते.

जिल्हाधिकारी श्री.कटियार म्हणाले की, तहसील कार्यालयातील सेतू केंद्रांचे आधुनिकिकरण सुरू असून, जशी सुविधा पासपोर्ट कार्यालयात मिळते तशीच सुविधा नागरिकांना सेतू कार्यालयात मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राला देशात सर्वात पुढे ठेवा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई: नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचा गुन्हे सिद्धतेमध्ये चांगला उपयोग होत आहे. या कायद्यांच्या प्रत्येक घटकातील अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्राला देशात सर्वात पुढे ठेवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत आयोजित बैठकीत दिले. ज्या घटकातील अंमलबजावणीमध्ये राज्य मागे आहे, अशा घटकाच्या अंमलबजावणीमध्ये पुढील काळात महाराष्ट्र देशात अन्य राज्यांच्या तुलनेत अव्वल असण्याची अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.बैठकीस गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गुन्हा घडल्यानंतर जलद गतीने तपास पूर्ण करीत आरोपींना शिक्षा देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग या कायद्यांच्या अंमलबजावणीमधून करण्यात येत आहे. यामुळे निश्र्चितच जलद गतीने आरोपींना शिक्षा होत आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावीरित्या अंमलबजावणी करण्यात यावी. कायद्याच्या प्रत्येक घटकाची अंमलबजावणी करताना अन्य राज्यांशी तुलना करण्यात यावी. यावरून आपली स्थिती समजून ज्या घटकाच्या अंमलबजावणीत वेग घेणे आवश्यक आहे तो घेण्यात यावा. सीसीटीएनएस (क्राइम अँड क्रिमिनल ट्रेकिंग नेटवर्क अँड सिस्टीम्स) प्रणालीवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोंदविण्यात आलेले एफआयआर इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच न्यायालयाकडे जावेत. ही प्रणाली गतीने कार्यान्वित करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. आरोप सिद्ध झाल्यानंतर ६० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करण्याचे प्रमाण वाढविण्यात यावे.

यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. या घटकाच्या प्रगतीचा विभागाने नियमित आढावा घ्यावा. कारागृह प्रशासनाच्या अनुषंगाने नागपूर आणि अमरावती दोन स्वतंत्र विभाग निर्माण करावे. नागपूर आणि वर्धा येथे नवीन कारागृह निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. यावेळी ठाणे कारागृह निर्मितीचा आढावाही घेण्यात आला.ई- साक्ष ला एफआयआर संलग्न करण्याची कार्यवाही गतीने पूर्ण करावी. नागरिक केंद्रीत सेवा देण्यात याव्यात. गुन्हा दाखल झाल्यानंतर तक्रारदाराला संदेश जाऊन त्यांच्या तक्रारींची सद्यस्थिती कळविली पाहिजे. कायद्यांच्या अंमलबजावणी संदर्भात सर्व पोलीस यंत्रणाचे प्रशिक्षण पूर्ण करून वेळोवेळी क्षमता बांधणीचे उपक्रम राबविण्यात यावे. गुन्हा सिद्धतेमध्ये न्याय सहाय्यक प्रयोगशाळांच्या नवीन मोबाईल व्हॅनचा उपयोग करावा. सर्व २५१ व्हॅन उपलब्ध करून घ्याव्यात, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.बैठकीला अपर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन) राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) इक्बाल सिंग चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, न्यायिक व तांत्रिक विभाग महासंचालक संजय वर्मा, प्रधान सचिव (विशेष) अनुप कुमार सिंग, प्रधान सचिव (विधि व न्याय) सुवर्णा केवले, सचिव (वैद्यकीय शिक्षण) धीरज कुमार, अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) निखिल गुप्ता आदी उपस्थित होते.

राज्यातील नवीन फौजदारी कायद्याची सद्यस्थिती थोडक्यात-राज्यात २ लाख ८८४ पोलिस अधिकारी / कर्मचारी यांचे प्रशिक्षण पूर्ण, दूरदृष्टी संवाद प्रणाली व्यवस्था २१४८ कोर्ट रूम आणि ६० कारागृहांमध्ये उपलब्ध, घरबसल्या तक्रार नोंदवण्यासाठी ई - एफआयआर ची सुविधा, १ जुलै २०२४ ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ९५८ ई- एफआयआर दाखल.

# भीम यूपीआयद्वारे 'मुंबई वन' तिकिटांवर २० टक्के सवलत

मुंबई : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) त्यांच्या एकात्मिक तिकीट प्रणालीचा भाग म्हणून मुंबई वन ॲप लाँच केले आहे. या मुंबई वन ॲपवर भीम यूपीआयद्वारे किमान २० रुपयांचे तिकीट खरेदी करणाऱ्या प्रवाशांना २० टक्के सूट मिळेल. ही ऑफर ३१ डिसेंबरपर्यंत वैध आहे, अशी माहिती एमएमआरडीएच्यावतीने देण्यात आली.एकीकृत तिकीट प्रणाली ही प्रवाशांसाठी प्रवास सुलभ करते. ज्यामुळे वाहतुकीच्या वेगवेगळ्या पद्धतींसाठी वेगवेगळी तिकिटे खरेदी करण्याची आवश्यकता दूर होते. मुंबई महानगर प्रदेशातील प्रवासी अनेकदा पाच महानगरपालिकांच्या ट्रेन, मेट्रो, मोनोरेल, बेस्ट बस आणि बसच्या संयोजनाचा वापर करून प्रवास करतात. पूर्वी, त्यांना प्रत्येक प्रकारच्या वाहतुकीसाठी स्वतंत्र तिकिटे खरेदी करावी लागत होती, जी वेळखाऊ आणि गैरसोयीची होती. यावर उपाय म्हणून, एमएमआरडीएने एकात्मिक तिकीट प्रणाली लागू करण्यासाठी अनेक वर्षे काम केले, जी अखेर ऑक्टोबरमध्ये सुरू करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या सुविधेचे उद्घाटन झाले.

मुंबई वन ॲपद्वारे, प्रवासी आता एकाच तिकिटाचा वापर करून मोनोरेल, मेट्रो, लोकल ट्रेन, बेस्ट आणि महानगरपालिका बसमधून प्रवास करू शकतात. तिकिटे खरेदी करणे आता सोपे झाले आहे आणि २० रुपये किंवा त्याहून अधिक किमतीच्या तिकिटांवर भीम यूपीआय पेमेंटसाठी २० टक्के सवलतीसह, प्रवाशांना या सर्व सेवांमध्ये प्रवास करताना बचत करता येईल. एमएमआरडीएने प्रवाशांना या सुविधेचा लाभ घेण्यास प्रोत्साहित केले आहे.




LATUR COLLEGE OF PHARMACY, LATUR

Shri Vetaleshwar Shikshan Sanstha's
**LATUR COLLEGE OF PHARMACY, LATUR**
Gurunathappa Bavage Knowledge City, Basweshwar chowk, katpur road, Latur.
Mob. No. :९८६०७७७१०५/९७६६०००६३३, Website- www.lcoplatur.com
(Approved by PCI New Delhi, Recognized by DTE & Govt. of Maharashtra, Affiliated to MSBTE.)

**बी. फार्मसी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया सूचना २०२५-२६**

**संस्था कोड २५३८**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी **बी. फार्मसी प्रथम वर्ष** पदवी अभ्यासक्रम संस्थेतील रिक्त जागा भरण्यासाठी समुपदेशनाद्वारे प्रवेश देण्यासाठी फेरी.

| अनु. क्र. | क्रियाकलाप | वेळापत्रक |
|---|---|---|
| १ | रिक्त जागा प्रदर्शित करणे | ११/११/२०२५ सकाळी ११:०० पर्यंत |
| २ | अर्जाची नोंदणी व त्याची पडताळणी करणे | ११/११/२०२५ ते १३/११/२०२५ दुपारी ०३:०० पर्यंत |
| ३ | तात्पुरती गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे | १४/११/२०२५ संध्याकाळी ०५:०० पर्यंत |
| ४ | सर्व प्रकारच्या उमेदवारांसाठी तक्रारी असल्यास सादर करणे | १५/११/२०२५ दुपारी ०३: ०० पर्यंत |
| ५ | अंतिम गुणवत्ता यादीचे प्रदर्शन | १५/११/२०२५ संध्याकाळी ०५:०० पर्यंत |
| ६ | संस्थेत जाऊन प्रवेशाची पुष्टी करणे | १६/११/२०२५ संध्याकाळी ०५:०० पर्यंत |

प्रवेशाचे संपूर्ण वेळापत्रक महाविद्यालयाच्या वेबसाईटवर व सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात आले आहे. प्रवेशाची पात्रता आणि प्रवेश प्रक्रिया हि राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष महाराष्ट्र शासन यांच्या नियमा नुसार सदरील प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल.

महाविद्यालयाचा पत्ता : बसवेश्वर चौक जवळ, कातपूर रोड, लातूर-४१३५१२

संपर्क क्र. ९५७९१८२६००, ७७०९२७२९८९, ९७६६०००६३३

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक, संपादिका श्रीमती पोर्णिमा गंगाधर अंबेकर यांनी, अंबेकर ऑफसेट प्रिटर्स क्रांतीनगर,खाडगाव रोड,लातूर येथे छापून तेथूनच प्रकाशित केले.
शहर कार्यालय :- गांधी मार्केट, साईड नं. १११, दुकान नबर १६९ लातूर.

# एसटीच्या धडकेने ज्येष्ठ नागरिक गंभीर जखमी

पुणे : स्वारगेट बस डेपोमध्ये (स्वारगेट बस स्थानक) एक विचित्र अपघात झाला. चालक एसटी मागे घेत होता. ही रिव्हर्सची प्रक्रिया सुरू असताना बसच्या मार्गात ज्येष्ठ नागरिक आला. बसचे एक चाक ज्येष्ठ नागरिकाच्या पायावरुन गेले. यामुळे ज्येष्ठ नागरिक जखमी झाला. जखमी झालेल्या व्यक्तीला तातडीने ससून रुग्णालयात नेण्यात आले. वेळेत उपचार मिळाल्यामुळे या व्यक्तीची प्रकृती स्थिर आहे. पण वय ६५ असल्यामुळे डॉक्टरांनी देखरेखीत उपचार सुरू ठेवले आहेत.

बसचे चाक पायावरुन गेल्यामुळे जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव शिवाजी कानडे असे असून त्यांचे वय ६५ वर्षे आहे. ते फलटण-मुंबई एसटी बसने प्रवास करत होते. बस स्वारगेट येथे उभी असताना ते पाय मोकळे करण्यासाठी खाली उतरले होते पण चालकाच्या हलगर्जीपणामुळे जखमी झाले. लवकरच शिवाजी कानडे यांच्या पायावर ससूनचे डॉक्टर शस्त्रक्रिया करणार आहेत. पायाच्या दुखापतीचे स्वरुप गंभीर असल्यामुळे शस्त्रक्रिया शक्य तितक्या लवकर केली जाईल.

# शाळेची बस दरीत कोसळली, एकाचा मृत्यू आणि अनेक जखमी

नंदुरबार : शाळेच्या मुलांना घेऊन चाललेली बस अक्कलकुवा तालुक्यातील देवगोई घाट परिसरात शे-दिडशे फूट खोल दरीत कोसळली. या दुर्घटनेत एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आणि २० ते ३० विद्यार्थी जखमी झाल्याचे प्राथमिक वृत्त आहे. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक आहे.

मोलगी गावातील विद्यार्थी बसने अक्कलकुवाच्या दिशेने निघाले होते. देवगोई घाटातील आमलिबारी परिसरातून जात असताना चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस दरीत कोसळली. अपघातात बसचे नुकसान झाले. एक विद्यार्थी दरीत कोसळलेल्या बसमध्ये दबल्यामुळे एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. बसमधील अनेक विद्यार्थी जखमी आहेत. स्थानिकांनी मदतकार्य सुरू केले आहे. पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथकही घटनास्थळी पोहोचले असून मदतकार्यात गुंतले आहेत.

# ड्रोन दिसताच बोंबाबोंब करणारी शिउबाठा अखेर तोंडावर पडली

मुंबई : शिउबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांचे निवासस्थान असलेल्या कलानगर परिसराजवळ ड्रोन उडत असल्याचे आढळले. या मुद्यावरुन शिउबाठा समर्थकांनी बोंबाबोंब करायला सुरुवात केली. पाळत ठेवण्याच्या हेतूने ड्रोनची व्यवस्था केली असल्याचा आरोप शिउबाठा समर्थकांनी केला. पण मुंबई पोलिसांच्या परवानगीने एमएमआरडीएने विशिष्ट कामासाठी ड्रोनची व्यवस्था केली असल्याची बातमी आली. ही बातमी येताच बोंबाबोंब करत असलेले शिउबाठा समर्थक तोंडावर पडले.

खेरवाडी, वांद्रे, वांद्रे - कुर्ला संकुल या भागांमध्ये ठिकठिकाणी एमएमआरडीए विविध प्रकल्पांवर काम करत आहे. या कामांशी संबंधित सर्वेक्षणासाठी ड्रोनचा वापर सुरू आहे. एमएमआरडीएने ड्रोन वापरण्यासाठी मुंबई पोलिसांकडून रितसर परवानगी घेतली आहे. मिळालेल्या परवानगीनुसार एमएमआरडीए ड्रोनचा वापर करत आहे. पण हे ड्रोन बघून काही जणांनी राजकीयदृष्ट्या लाभ घेण्याच्या हेतूने बोंबाबोंब केली. त्यांचा हा हेतू अयशस्वी झाला कारण ड्रोन बाबतचे सत्य थोड्याच वेळात जगासमोर आले. मुंबई पोलीस दलाने ड्रोन एमएमआरडीएचे आहेत आणि परवानगी घेऊनच वापरले जात आहेत, असे जाहीररित्या सांगितले. यामुळे बोंबाबोंब करणाऱ्यांची पंचाईत झाली.

# थंडीच्या लाटेची शक्यता- आपल्या जनावरांचा थंडीपासून बचाव करा! लातूर जिल्हा पशुसंवर्धन विभागाचा पशुपालकांना आवाहन

लातूर : अतिवृष्टी आणि बदलत्या हवामानामुळे लातूर जिल्ह्यात तापमान झपाट्याने कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार नोव्हेंबरच्या उत्तरार्धात थंडीची लाट जाणवू शकते. ही स्थिती विशेषतः ग्रामीण भागातील पशुधनासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे पशुपालकांनी आपल्या जनावरांचा थादिपासून बचाव करण्यासाठी उपायोजना करण्याचे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले आहे. जनावरांच्या शरीराचे तापमान कमी झाल्यास त्यांना हायपोथर्मिया, श्र्वसनाचे आजार, दूध उत्पादनात घट, आणि अचानक मृत्यू यांसारख्या घटना घडू शकतात. नवजात वासरे, अशक्त आणि दुभती जनावरे या काळात सर्वाधिक जोखमीच्या गटात येतात. या जनावरांचा थंडीपासून बचाव करण्यासाठी जनावरांना उबदार निवारा तयार करावा.

गोठ्याभोवती पडदे लावावेत, पत्र्याच्या छपरावर वाळलेले गवत पसरावे. जमिनीवर वाळलेला चारा किंवा कडब्याचा थर ठेवावा. थंडी फार वाढल्यास गोठ्यात कृत्रिम प्रकाश किंवा बल्ब वापरावा. धूर निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी.जनावरांना थंड पाणी देऊ नये, दिवसातून ३-४ वेळा कोमट पाणी द्यावे. पूरक खाद्य, खनिज मिश्रण, मीठ, व जीवनसत्वांचा वापर करून जनावरांना संतुलित आहार द्यावा.

अशक्त आणि गाभण जनावरांना अतिरिक्त पौष्टिक खाद्य द्यावे जनावरांचा गोठा कोरडा ठेवावा, तसेच दररोज साफ करा वा. ओलावा व धूर टाळावा, गोठ्यात तुळस, लेमनग्रास किंवा दनरूडी यांच्या जुड्या लटकवल्यास कीटक दूर राहतात. लाळखुरकुत, घटसर्प, पीपीआर, एफएमडी, बीक्यू, एचएस यांसारख्या रोगांविरुद्ध लसीकरण करून घ्यावे. कृमी नियंत्रणासाठी वेळोवेळी औषधे द्यावीत. आवश्यक औषधे, सलाईन आणि इलेक्ट्रोलाइट्सचा साठा तयार ठेवावा.

नवजात वासरे, करडी, अशक्त, दुभती व आजारी जनावरे यांना उबदार ठिकाणी ठेवावे. रानात जनावरे ठेवू नयेत.

त्यांच्यासाठी उबदार शेड तयार करावे. मेंढ्यांची लोकर कापणी थांबवावी. कोंबड्यांच्या शेडला रात्री पडदे लावावेत आणि तापमान २१-२३ओउ ठेवावे. पक्ष्यांना कोमट पाणी व पौष्टिक खाद्य द्यावे,.

जनावरांमध्ये थरथर, सुस्ती, अन्न न खाणे, श्र्वास घेण्यास त्रास, त्वचा काळसर पडणे, दूध उत्पादन घटणे अशी लक्षणे दिसल्यास तत्काळ पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधा. सरकारी रुग्णालयांमध्ये आवश्यक औषधे व तज्ज्ञ कर्मचारी उपलब्ध आहेत.

थंडीची लाट ही नैसर्गिक आपत्ती असली तरी तिचा परिणाम कमी करणे आपल्या हातात आहे. वेळेवर तयारी, गोठ्यातील व्यवस्थापन, आणि पशुवैद्यकीय सल्ल्याचे पालन यामुळे आपण आपले पशुधन सुरक्षित ठेवू शकतो, असे डॉ. शिंदे यांनी म्हटले आहे.

# मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक बिनविरोध निवड

मुंबई : मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक यांची बिनविरोध निवड झाली आहे. अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केलेल्या सर्वांनी उमेदवारी मागे घेतल्याने नाईक यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला. अशाप्रकारे अजिंक्य नाईक पुन्हा एकदा एमसीएचे अध्यक्ष बनले आहेत.अध्यक्षपदासाठी जितेंद्र आव्हाड, प्रसाद लाड, मिलिंद नार्वेकर, डायना एडलजी आणि विहंग सरनाईक यांनी अर्ज दाखल केले होते मात्र या सर्वांनी उमेदवारीतून माघार घेतल्याने नाईक बिनविरोध अध्यक्ष झाले.आता मुंबई क्रिकेट असोसिएशनमधील उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव आणि खजिनदार या पदांसाठी निवडणूक होणार आहे.मुंबई क्रिकेट असोसिएशनचे तत्कालीन अध्यक्ष अमोल काळे यांचे निधन झाल्यानंतर नाईक अध्यक्ष झाले होते. नंतर आता पुन्हा एकदा त्यांची बिनविरोध अध्यक्षपदी निवड झाली आहे. अजिंक्य नाईक हे २३ जुलै २०२४ रोजी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे सर्वात तरुण अध्यक्ष बनले होते. वयाच्या ३८ व्या वर्षी अध्यक्षपदी विराजमान होण्याचा मान त्यांनी मिळवला होता.

अध्यक्षपदासाठीची निवडणूक बिनविरोध पार पडल्याने आता इतर पदांसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. ही निवडणूक १२ नोव्हेंबर रोजी होईल. उपाध्यक्षपदासाठी ९, सचिवपदासाठी १०, सहसचिवपदासाठी ९ आणि खजिनदारपदासाठी ८ अर्ज आले आहेत. तसेच कार्यकारिणी सदस्यांसाठी तब्बल ४८ अर्ज दाखल झाले आहेत. पुढील काही दिवसांत या महत्त्वाच्या पदांवर कोणाची वर्णी लागते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




# संसदेचे हिवाळी अधिवेशन १ डिसेंबरपासून



नवी दिल्ली : संसदेचे हिवाळी अधिवेशन १ डिसेंबर रोजी सुरू होणार आहे आणि १९ डिसेंबरपर्यंत चालेल, अशी घोषणा संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी शनिवारी केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेचे हिवाळी अधिवेशन बोलावण्याच्या सरकारच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली.

रिजिजू यांनी एक्सवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी १ डिसेंबर २०२५ ते १९ डिसेंबर २०२५ पर्यंत संसदेचे हिवाळी अधिवेशन बोलावण्याच्या सरकारच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. आपल्या लोकशाहीला बळकटी देणाऱ्या आणि लोकांच्या आकांक्षा पूर्ण करणाऱ्या रचनात्मक आणि अर्थपूर्ण अधिवेशनाची अपेक्षा आहे. या अधिवेशनात लोकशाही बळकट करणं आणि सामान्य नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीनं सकारात्मक चर्चा व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

संसदेच्या होऊ घातलेल्या अधिवेशनाचा कालावधी अन्य अधिवेशनांपेक्षा कमी असेल. या अधिवेशनात बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालांचे पडसाद उमटताना दिसतील. देशातील १२ राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये निवडणूक आयोगाने विशेष सखोल फेरनिरीक्षण सुरु केलं आहे. त्याला विरोधी पक्षांकडून विरोध सुरु आहे. मतदार यादीतील अनेक घोळ समोर आले आहेत. या संदर्भात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गेल्या तीन महिन्यांत तीन पत्रकार परिषदा घेत पुराव्यांसह मतचोरीचे आरोप केले आहेत. त्यामुळे आता हा विषय संसदेत गाजण्याची दाट शक्यता आहे.

वादळी चर्चा होण्याची शक्यता-संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सरकार अनेक महत्त्वाची विधेयकं मंजूर करण्याचा प्रयत्न करेल. घटनेत १२९ वी, १३० वी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडलं जाईल. त्यासोबतच जन विश्र्वास विधेयक, दिवाळखोरी विधेयकही संसदेत आणण्यात येईल. याआधी २०१३ मध्ये संसदेचं सर्वात लहान हिवाळी अधिवेशन झालं होतं. ५ ते १८ डिसेंबर या कालावधीत अधिवेशन संपन्न झालं होतं. केवळ १४ दिवसांच्या अधिवेशनात ११ बैठका झाल्या होत्या. यंदाच्या हिवाळी अधिवेशनात वादळी चर्चा होण्याची शक्यता आहे. इंडिया ब्लॉकमधील पक्षांनी एसआयआरवरुन रान पेटवले आहे. त्याचे पडसाद आता संसदेत उमटू शकतात. यावरुन विरोधक सत्ताधाऱ्यांची कोंडी करण्याची शक्यता आहे. संसदेच्या गेल्या अधिवेशनात लोकसभा, राज्यसभेत जोरदार संघर्ष पाहायला मिळाला होता.


# 'बिहारमध्ये घुसखोर नाही, स्थानिकच सरकार बनवतील!'

विकास आणि सुरक्षेसाठी 'एनडीए'ला निवडून देण्याचे अमित शाह यांचे आवाहन

पूर्णिया: बिहारमध्ये घुसखोर सरकार बनवणार नाहीत, केवळ स्थानिकच सरकार बनवतील, असा ठाम दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज केला. विकसित आणि सुरक्षित राज्यासाठी मतदारांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पुन्हा निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले.

पूर्णिया येथील एका निवडणूक रॅलीला संबोधित करताना शाह यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि राजदचे तेजस्वी यादव यांच्यावर 'घुसखोर वाचवा यात्रे' द्वारे घुसखोरांना पाठिंबा दिल्याचा आरोप केला. एनडीए सर्व बेकायदेशीर प्रवेश करणाऱ्यांची ओळख पटवून त्यांना देशातून हाकलून लावेल, त्यांच्या नावांची मतदार यादीतून नोंदणी काढून टाकेल आणि सीमांचलमध्ये अतिक्रमण केलेली जमीन परत घेईल, असे ते म्हणाले.शाह यांनी राजदच्या मागील राजवटीवर हल्ला चढवला. ती राजवट 'लूट, खून आणि खंडणी' साठी ओळखली जात होती आणि आता 'जंगलराज' पुन्हा येण्याचा प्रयत्न करत आहे, असा इशारा त्यांनी दिला. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राज्यात कायदा आणि सुव्यवस्था पुन्हा स्थापित केल्याचे श्रेय त्यांनी दिले.

शाह यांनी राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा अधोरेखित करताना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताने 'सर्जिकल आणि एअर स्ट्राइक' द्वारे दहशतवादाला जशास तसे उत्तर दिले आहे. भविष्यातील संरक्षणासाठी दारूगोळा आता 'मेड इन बिहार' असेल, असेही त्यांनी जाहीर केले.



Shri Vetaleshwar Shikshan Sanstha's
**LATUR COLLEGE OF PHARMACY, LATUR**
Gurunathappa Bavage Knowledge City, Basweshwar chowk, katpur road, Latur.
Mob. No. :९८६०७७७१०५/९७६६०००६३३, Website- www.lcoplatur.com
(Approved by PCI New Delhi, Recognized by DTE & Govt. of Maharashtra, Affiliated to MSBTE.)
**प्रवेश प्रक्रिया सूचना २०२५-२६**

**संस्था कोड २५३८**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी **डी. फार्मसी प्रथम वर्ष** पदविका अभ्यासक्रम
संस्थेतील रिक्त जागा भरण्यासाठी समुपदेशनाने प्रवेश देण्यासाठी फेरी.

| अनु. क्र. | क्रियाकलाप | वेळापत्रक |
|---|---|---|
| १ | रिक्त जागा प्रदर्शित करणे | ११/११/२०२५ सकाळी ११:०० पर्यंत |
| २ | अर्जाची नोंदणी व त्याची पडताळणी करणे | ११/११/२०२५ ते १३/११/२०२५ दुपारी ०३:०० पर्यंत |
| ३ | तात्पुरती गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे | १४/११/२०२५ संध्याकाळी ०५:०० पर्यंत |
| ४ | सर्व प्रकारच्या उमेदवारांसाठी तक्रारी असल्यास सादर करणे | १५/११/२०२५ दुपारी ०३: ०० पर्यंत |
| ५ | अंतिम गुणवत्ता यादीचे प्रदर्शन | १५/११/२०२५ संध्याकाळी ०५:०० पर्यंत |
| ६ | संस्थेत जाऊन प्रवेशाची पुष्टी करणे | १६/११/२०२५ संध्याकाळी ०५:०० पर्यंत |

प्रवेशाचे संपूर्ण वेळापत्रक महाविद्यालयाच्या वेबसाईटवर व सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात आले आहे. प्रवेशाची पात्रता आणि प्रवेश प्रक्रिया हि तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

महाविद्यालयाचा पत्ता : बसवेश्वर चौक जवळ कातपूर रोड, लातूर-४१३५१२

**संपर्क क्र. ९५७९१८२६००, ७७०९२७२९८९, ९७६६०००६३३**